आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ एप्रिल २०१२ । वर्ष २१ । अंक २

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०

## पाक्षिक शेतकरी संघटक वर्धापन दिन उत्साहात साजरा!



पाक्षिक शेतकरी संघटकच्या वर्धापन दिनी २१ व्या वर्षातील पहिल्या अंकाचे प्रकाशन करताना डावीकडून ज्येष्ठ अभ्यासक, शुगर इंडियाचे संपादक श्री. अजित नरदे, ज्येष्ठ नेते डॉ. मानवेंद्र काचोळे, साप्ताहीक साधनाचे कार्यकारी संपादक श्री. विनोद शिरसाठ, अनंतराव देशपांडे व मा. खा. शरद जोशी

## अतिरेकी राबवताहेत शासनाची धोरणे

मणिपूरमधील भूमीगत संघटना युआरएफ- युनायटेड रिव्हॉल्युशनरी फ्रण्टने नुकतेच मणिपूरची राजधानी इंफाळ येथून आपली अर्थनीती जाहीर करताना कांदा, बटाटा, लसूण, तंबाखू इत्यादी शेतमालाची देशाच्या इतर राज्यांतून आयात करू नये असा फतवा काढला आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी स्वावलंबी बनण्यासाठी हा फतवा काढण्यात आल्याचे युआरएफने म्हटले आहे. शेती धोरणांची परिणती ही आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येत झाली आहे. बॉम्ब आणि बंदुका चालवण्यापेक्षा देशाच्या इतर राज्यांतून होणारी शेतीमालाची आयात थांबवणे हेच मोठे शस्त्र आहे, असे त्यांच्या लक्षात आलेले दिसते. युआरएफ ज्या पद्धतीने अतिरेकी कारवायांसाठी शेतीमालाच्या आयात बंदीचा शस्त्र म्हणून उपयोग करीत आहे, हे शस्त्र आमच्या लोकनियुक्त सरकारने गेली साठ वर्षे शेतकऱ्यांविरुद्ध वापरलेले आहे. **-ज्ञानेश्वर शेलार**

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २९ । अंक २ । २१ एप्रिल २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

अंक मांडणी
**श्रीकांत दत्तात्रय झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.





## अंतरंग


वृत्तांत
**शेतकरी संघटक पाक्षिकाचा वर्धापन दिन**
वृत्तांकन श्री. निवृत्ती कडलग ........ ३

आजकाल
**अतिरेकी राबवताहेत शासनाची धोरणे**
ज्ञानेश्वर शेलार ........ ९

मुद्दा
**भुरट्याला तुरा, तर पोशिंद्याला धतुरा**
गिरधर पाटील ........ ११

मिरचीचं खळं
**साहेब, आता आपलं व्हावं तरी कसं?**
बाबू सोंगाड्या ........ १२

कॉमन नॉन सेन्स
**खुज्या नेतृत्वाचा देश**
सुधाकर जाधव ........ १३

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १६

# चळवळी आणि पत्रकारिता

शेतकरी संघटक पाक्षिकाचा २८वा वर्धापन दिन औरंगाबाद येथे ६ एप्रिल रोजी साजरा झाला. या कार्यक्रमात साप्ताहिक साधनाचे कार्यकारी संपादक विनोद शिरसाठ यांनी फार महत्त्वाचे मुद्दे रसिकांसमोर ठेवले. इतर विवेचन करत असतानाच चळवळीची पार्श्वभूमी असलेली नियतकालिके वर्तमानपत्रे मात्र बंद पडलेली अथवा खुरटलेली दिसतात, यावर त्यांनी परखडपणे विश्लेषण केले आणि त्यात व्यावसायिक पातळीवरती या नियतकालिकांचं कमी पडणं स्पष्ट केलं. ही खरंच विचार करण्यासारखी गोष्ट आहे. एकीकडे बाजारू म्हणून ज्या संस्कृतीला हिणवलं जातं त्या सगळ्या आस्थापना आपला ग्राहकवर्ग कोण आहे हे शोधण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. त्यांचे नंबर मिळवणे, त्यांच्याशी सतत संपर्क करून आपलं उत्पादन त्यांच्यापर्यंत पोहोचविणे, त्यांना खरेदी करण्यास भाग पाडणं यासाठी मोठ्या योजना आखल्या जातात. विशेष प्रयत्न केले जातात. इतकंच नाही, तर मार्केटींग विषयातील तज्ज्ञ याचा वेगळा विचार करतात आणि त्याप्रमाणे धोरणं अमलात आणली जातात. आपला ग्राहक वर्ग टिकवून ठेवण्यासाठी नवीन व्यवस्थेला मोठा आटापीटा करावा लागतो. याच्या नेमकं उलट चळवळीची पार्श्वभूमी असलेल्यांना एक फायदा असा मिळतो, एक विशिष्ट वर्ग त्यांच्याशी कायमच बांधलेला असतो. त्याची सहानुभूती नेहमीच चळवळीला मिळत असते. प्रत्यक्ष सक्रीय असलेले किंवा नसलेले सगळेच लोक शक्य होईल ती मदत करण्यास अनुकूल असतातही. विशेषतः जेव्हा आपण नियतकालिकांचा विचार करतो तेव्हा अशा नियतकालिकाला एक हक्काचा वाचक वर्ग लाभलेला असतो. आता प्रश्न असा आहे, या हक्काच्या वाचक वर्गापर्यंत सातत्याने पोहोचणे त्यांच्याशी संपर्क ठेवणे, त्यांच्या इच्छा आकांक्षा जाणून घेणे आणि त्याचे प्रतिबिंब आपल्या अंकामध्ये उमटू देणे हे का होत नाही. हे घडताना दिसत नाही, हे तर खरंच आहे. ज्यांना आपण व्यावसायीक माध्यमं म्हणून हिणवतो त्यांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला आढळतो. गावोगावी अगदी खेड्यापाड्यातसुद्धा वितरणाची एक यंत्रणा या माध्यमांनी उभी केलेली असते. ज्या ठिकाणी संपर्काची साधनंसुद्धा नाहीत. त्या ठिकाणी कोकाकोलासारखं शीतपेय किंवा साखळीसमुहातील एखाद्या वृत्तपत्राचा अंक मात्र सहज उपलब्ध असतो. हे काय गौडबंगाल आहे. याचाच अर्थ असा की, माणसाच्या मूलभूत प्रेरणा दाबून टाकण्याचंच काम चळवळी करतात की काय?




अंगारमळा या आत्मचरित्रात्मक लेखसंग्रहात शरद जोशी यांनी 'बस करा हे समाजसेवेचे ढोंग!' हा एक अप्रतिम लेख लिहिलेला आहे. त्यामध्ये सामाजिक उपक्रमाची कठोरपणे चिकित्सा केली आहे. अंतर्नाद दिवाळी अंकात हा लेख आल्यावर मोठी चर्चा झडली होती. त्याचीच इथे आठवण होते आहे. विनोद शिरसाठ जेव्हा चळवळीची पार्श्वभूमी असलेल्या नियतकालिकांकडून किमान व्यावसायिक कौशल्याची अपेक्षा ठेवतात. त्यामागे त्यांची भूमिका काहीशी अशीच असावी.

आज जग ज्या व्यवस्थेतून जात आहे. त्या व्यवस्थेमध्ये 'बाजार' ही एक फार महत्त्वाची गोष्ट म्हणून पुढे येते आहे. खरे तर शेतीमधील उत्पादन करायला ज्यावेळेस माणसाने सुरुवात केली. तिथूनच बाजार सुरू झाला असं म्हणावं लागेल. कारण, एका दाण्याचे हजार दाणे होण्याचा चमत्कार शेतीत घडला होता. हे तयार झालेलं अन्न जेव्हा शिल्लक राहायला लागलं तेव्हा ते दुसऱ्याला देऊन त्याच्याकडून आपल्याला गरजेची गोष्ट मिळवावी ही प्रेरणा माणसाला झाली आणि बाजार अस्तित्वात आला. आज ज्याला बाजारवादी अर्थव्यवस्था म्हणून डावे लोक हिणवतात तेव्हा ते सपशेल विसरून जातात की, बाजाराच्या 'स्वार्थ' या प्रेरणेनेच आजपर्यंतचा आर्थिक विकास घडून आला आहे.

विनोद शिरसाठांचीच मांडणी पुढे न्यायची तर असं म्हणावं लागेल, चळवळीची म्हणून जी नियतकालिकं आहेत. त्यांनी डोळसपणे आपला जो वाचक वर्ग आहे, त्यांच्या आशा आकांक्षांसाठी काही एक प्रयत्न करणे जरूरीचे आहे. जर हे प्रयत्न योग्य दिशेने झाले, तर त्याचा उपयोग जसा त्या नियतकालिकांना होईल, तसाच बाजारालाही होईल. उदाहरणार्थ शेतकरी संघटक या पाक्षिकाच्या सर्व वाचकांनी कापूस निर्यातीसंदर्भात आपली मतं ठामपणे आणि ठोस पद्धतीने व्यक्त केली, तर त्याचा एक दबाव धोरण ठरविणाऱ्यांवरती येईल, परिणामी या वर्गाच्या विरोधी धोरणं आखली जायची शक्यता कमी होईल. म्हणजे परत एकदा चळवळींचाच; पण वेगळ्या बाजूने विचार करायची गरज यातून स्पष्ट होत जाईल. कायमस्वरूपी रस्त्यावर उतरणे, मोर्चे काढणे, रेल्वे रोकणे, बंद पुकारणे या माध्यमातून आपली प्रतिक्रिया व्यक्त करणे योग्य ठरत नाही. असा दबाव पूर्वी शासनावरती यायचा; पण तो आता येत नाही. त्यामुळे जर का नियतकालिकांच्या माध्यमातून (इथे विषय नियतकालिकांचा आहे म्हणून आम्ही त्या मर्यादीत अर्थाने म्हणतो आहोत) आपली मत-मतांतरे व्यक्त केली पाहिजेत. आज इतरही साधने लोकांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी प्रभावी ठरत आहेत. उदाहरणार्थ इंटरनेट, फेसबुक इत्यादी. मुंबईच्या झोपडपट्ट्यांचं एक छायाचित्र नुकतंच एका मोठ्या वृत्तपत्राने प्रसिद्ध केलं. बहुतांश झोपडपट्ट्यांच्या छतांवर महागडे डीश अँटेना आढळून आले. याचा अर्थच असा, टीव्ही चॅनेल्स ही फक्त तथाकथित संपन्न लोकांची मक्तेदारी राहिली नसून झोपडपट्टीतला माणूसही त्याचा ग्राहक आहे. याचाच परिणाम म्हणजे या माध्यमातून सामान्य माणसाच्या आशाआकांक्षेचं चित्र व्यक्त होत जातं. ग्रामीण भागातील समस्यांवर मोठ्या प्रमाणात मराठी चित्रपट येत आहेत, याचं साधं कारण तेच आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गातला एक वर्ग जो नोकरदार बनला, चार पैसे कमावू लागला, तालुक्याच्या गावी घर करून राहू लागला, ज्याची नाळ अजूनही ग्रामीण भागाशीच जुळलेली आहे, स्वाभाविकच अशा प्रेक्षकांसाठी ग्रामीण पार्श्वभूमी असलेले आणि त्यांच्या समस्यांचं चित्रण करणारे चित्रपट जवळचे वाटणारच. ग्रामीण म्हणविल्या जाणारे साहित्य मोठ्या प्रमाणात गेल्या दोन दशकांत लिहिल्या वाचल्या गेलं, त्याला कारणीभूतही ग्रामीण भागातील तयार झालेला नवमध्यमवर्ग हाच आहे.

चळवळींचा विचार करत असताना साचेबद्ध पद्धतीने चळवळी न करता नव्या परिभाषेतून त्यांना बोलावे लागेल आणि या चळवळींना भाषा देण्याचं काम हे नियतकालिकांना करावं लागेल.

# शेतकरी संघटक पाक्षिकाचा वर्धापन दिन



शेतकरी संघटक पाक्षिकाचा २८ वा वर्धापन दिन कार्यक्रम ६ एप्रिल २०१२ रोजी कलश मंगल कार्यालय, औरंगाबाद येथे संपन्न झाला.

सुरुवातीस कार्यकारी संपादक श्री. श्रीकांत उमरीकर यांनी प्रास्ताविक केले. शेतकरी संघटकची सुरुवात ६ एप्रिल १९८३ला आंबेठाणहून झाली, असे सांगून शेतकरी संघटकविषयी सविस्तर विवेचन केले. त्यानंतर डॉ. मानवेंद्र काचोळे यांच्या हस्ते साप्ताहीक साधनाचे कार्यकारी संपादक विनोद शिरसाठ व शुगर इंडियाचे संपादक, शेतकरी संघटनेचे अजित नरदे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी निपाणी तंबाखू आंदोलनातील १२ शहीद हुतात्मे व वामनराव चटप यांच्या मातोश्री यांना दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर विनोद शिरसाठ, अजित नरदे व मा. शरद जोशी यांनी विचार मांडले.

## विनोद शिरसाठ

१९९१ साली उदारीकरणास सुरुवात झाली तेव्हा मी दहावीत होतो. १९८० ते ९०च्या काळात चळवळ खूप फॉर्मात होती, १९९० नंतर चळवळीचा ऱ्हास झाला असे मला वाटते. तसेच १९९१ नंतर प्रसारमाध्यमे प्रगल्भ झाली. चळवळ व प्रसारमाध्यमे हे दोन्ही घटक परस्परांना कोठे छेद देतात हे पाहायला हवे. प्रसार माध्यमांचे कार्य हे माहिती देणे, मनोरंजन करणे, प्रबोधन करणे असे आहे. चळवळीचे कार्य हे स्पर्धा करणे, प्रबोधन करणे आणि रचनात्मक कार्य करणे असे आहे.

प्रसार माध्यमांमध्ये उथळपणा व सवंगपणा वाढत चाललाय तसेच चळवळी आता संपत चालल्यात. चळवळीत नवीन काही घडत नाही. प्रसारमाध्यमे व चळवळी परस्परांना पूरक आहेत. त्या परस्परांकडून जास्त अपेक्षा बाळगतात. १५ ते २० वर्षांपासून टीव्ही प्रकाशझोतात आहे. इंटरनेट आता प्रकाशात येत आहे. प्रिंट मीडियाही महत्त्वाचे काम बजावत आहे. मुख्य प्रवाहाकडून चळवळी व आंदोलनाच्या काय अपेक्षा आहेत हे तपासले तर चळवळी, आंदोलनाला वाटते की, प्रसारमाध्यमे आमची बाजू मांडत नाही. माध्यमांतील प्रतिनिधींना चळवळीचा वारा लागलेला नसतो. त्यामुळे त्यांच्या प्रसारणात उथळपणा दिसतो. माध्यमांनी वितरण, अर्थकारण, व्यवस्थापनाबाबत दीर्घकालीन नियोजन करायला हवे.

व्यवस्थापन व वितरण हे दोन मुख्य घटक आहेत. बचत, काटकसर कोठे करता येईल यावर लक्ष द्यायला हवे. जे माध्यम तोटा भरून काढण्याकरिता देणग्यांच्या माध्यमातून पैसा कमावतात अशा माध्यमांना भविष्य नाही.

साधना दिवाळी अंकाला २५ लाख रुपयांच्या जाहिराती मिळाल्या. साधनाला जाहिराती मिळत नाही जे काही मिळते ते देणग्या आहेत. व्यक्तिगत संबंधांमुळे या जाहिराती (देणग्या) मिळतात. या क्षेत्रात ज्यांनी यश मिळवले, त्यांनी उदारीकरणाचा अंगिकार केलेला आहे.

१९९१ नंतर आधुनिक अध्यात्माचा उत्कर्ष व सामाजिक संस्था, संघटनांच्या ऱ्हासाची सुरुवात एकाच वेळी झाली. सामाजिक संस्था, संघटनांकडे असणारा वर्ग आधुनिक अध्यात्माकडे वळला आहे.

जनशक्ती वाचक चळवळीने 'समग्र शरद जोशी' पुस्तकांचे प्रकाशन केले. समाधान वाटले; पण चळवळ ऐन भरात असताना ही पुस्तके का उपलब्ध झाली नाही? याबाबत आश्चर्य वाटते! चळवळ जोरात असताना या मुद्द्याकडे दुर्लक्ष झाले. समाजाचा ओपिनिअन मेकर दूर राहिला. ही पुस्तके त्याच वेळेस आली असती तर शेतकरी संघटनेचे आयुष्य आणखी दहा वर्षांनी वाढले असते.

साप्ताहीक साधनाने शेती व शेतकरी या विषयांवर विशेषांक काढला होता. मेधा पाटकर 'आंदोलन' चालवतात. अशी साप्ताहीके मासिके तेच



“

१९९१ नंतर आधुनिक अध्यात्माचा उत्कर्ष व सामाजिक संस्था, संघटनांच्या ऱ्हासाची सुरुवात एकाच वेळी झाली. सामाजिक संस्था, संघटनांकडे असणारा वर्ग आधुनिक अध्यात्माकडे वळला आहे.

जनशक्ती वाचक चळवळीने ‘समग्र शरद जोशी’ पुस्तकांचे प्रकाशन केले. समाधान वाटले; पण चळवळ ऐन भरात असताना ही पुस्तके का उपलब्ध झाली नाही? याबाबत आश्चर्य वाटते! चळवळ जोरात असताना या मुद्द्याकडे दुर्लक्ष झाले. समाजाचा ओपिनिअन मेकर दूर राहिला. ही पुस्तके त्याच वेळेस आली असती तर शेतकरी संघटनेचे आयुष्य आणखी दहा वर्षांनी वाढले असते.

साप्ताहीक साधनाने शेती व शेतकरी या विषयांवर विशेषांक काढला होता. मेधा पाटकर ‘आंदोलन’ चालवतात. अशी साप्ताहीके मासिके तेच तेच लोक सोडून दुसरे लोक किती वाचतात हा अभ्यासाचा विषय आहे. चळवळी, आंदोलनातील लोकांना रोज परीक्षा द्यावी लागत नाही. माध्यमांतील लोकांना रोज परीक्षा द्यावी लागते. माझ्या मते प्रसारमाध्यमांचा उपयोग करून घेण्यास चळवळीतील लोक कमी पडतात. - **विनोद शिरसाठ**

तेच लोक सोडून दुसरे लोक किती वाचतात हा अभ्यासाचा विषय आहे.

चळवळी, आंदोलनातील लोकांना रोज परीक्षा द्यावी लागत नाही. माध्यमांतील लोकांना रोज परीक्षा द्यावी लागते. माझ्या मते प्रसारमाध्यमांचा उपयोग करून घेण्यास चळवळीतील लोक कमी पडतात.

तुमच्या अंकात वाचावेसे वाटेल असे किती पाने आहेत हे पाहावे लागेल. मला साधनामध्ये काम करताना निराशा येत नाही, अस्वस्थता येते.

अजूनही उदारीकरण, कॉम्प्युटर, पवनचक्की, मोठे रस्ते, शेतमालाला रास्त भाव या विषयावर तीच माणसे तीच विधाने वापरतात, तोच विचार करतात.

आधुनिक अध्यात्म व चळवळी हा पीएचडीचा विषय आहे. निरीक्षणे बरोबर; परंतु निष्कर्ष चूक असा एक सिद्धांत आहे. शिक्षण व्यवस्थेचा बट्ट्याबोळ झाला आहे हे निरीक्षण काही व्यक्ती करतात. शिक्षण कालचे व आजचे याचा अभ्यास करून निष्कर्ष काढा. दहा वर्षांपूर्वीची परिस्थिती चांगली होती, लोकशाहीबाबत निष्कर्ष काढताना २५ आमदार-खासदारांवरून निष्कर्ष काढला जातो. त्यामुळे नकारात्मक संदेश जनतेत जातो. हा संधीचा काळ आहे. पूर्वीचे जातीधर्माचे अडथळे बरेच दूर झाले आहेत. युपीएससी/एमपीएससीला ५० टक्क्यांपेक्षा जास्त मुले/मुली ग्रामीण भागांतून येतात. उदारीकरण व आरक्षण या गोष्टी परस्परांना पूरक आहेत.

माध्यमांमध्ये कालसुसंगत आकलन फार कमी वेळेला केले जाते. माध्यमांमध्ये आदिवासी भागाचे पुरेसे प्रतिबिंब पडत नाही व त्या समस्यांचे आकलन असलेले प्रसारमाध्यमांत लोक कमी आहेत. पर्यायी माध्यम चालवणाऱ्यांना पूर्वीपेक्षा आता जास्त वाव आहे असे मला वाटते. ८०० ते १००० शब्दांपेक्षा मोठा लेख आता मोठ्या वृत्तपत्रांतून घेता येत नाही. कारण त्यांची ती विशिष्ट मर्यादा आहे; परंतु नियतकालिके व चळवळींचे मुखपत्रे यापेक्षा मोठे लिखाण छापू शकतात हे त्यांचे बलस्थान ठरताना दिसते आहे. अंकाचा दर्जा दोन-चार महिन्यांत सुधारता येतो; पण वितरण/अर्थकारण २-४ महिन्यांत सुधारणे शक्य नाही. मुख्य परिस्थितीला वळण देणारा जो वर्ग आहे त्याच्यापर्यंत तुमचा अंक गेला पाहिजे. शेतकरी संघटक हा फक्त शेतकरी व ग्रामीण वर्गापुरताच मर्यादित न राहता शहरी भागात तो वाचला जावा यासाठी प्रयत्न करायला हवेत.

## अजित नरदे

शेतकरी संघटनेत, चळवळीत काम करणारे खूप होते; पण लिहिणारे कमी होते त्याचा फायदा मला झाला. जन्माने जात मिळते, तसेच जन्माने विचारधाराही मिळते. मी समाजवादी घरात जन्माला आलो; पण मी समाजवादी झालो नाही.

८० ते ९० पर्यंत नेहरूवादी अर्थव्यवस्था होती, तेव्हा सर्व प्रसारमाध्यमे चळवळीच्या विरोधात होती. तरी लोकांची/शेतकऱ्यांची संख्या आंदोलनात खूप असायची. मी १९८१ साली पुणे वसंत व्याख्यानमालेत मा. शरद जोशींचे व्याख्यान ऐकले. त्या व्याख्यानामध्ये ‘गरिबी दूर करण्याकरिता सरकारने काहीच करायची गरज नाही. फक्त गरिबी कायम राहावी यासाठी शासन जे काही करते ते सर्व थांबवायला हवे, शेतकऱ्यांना रास्त भाव सरकारने द्यायची गरज नाही, फक्त शेतकऱ्यांना भाव मिळू नये, म्हणून जे धोरणं आखता ते करू नका. म्हणजे भाव मागण्याची गरज पडणार नाही. हे ऐकून मी शेतकरी संघटनेकडे ओढला गेलो.

१९९१ मध्ये शेतकरी संघटनेने उदारीकरणाला पाठिंबा दिला. डंकेल प्रस्ताव, गॅट करार हे अवघड विषय अडाणी शेतकऱ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले. शेगाव मेळाव्यात चतुरंग शेतीचे महत्त्व विशद केले. सीता शेती, माजघर शेती, प्रक्रिया शेती, शिवार, डिपार्टमेंटल स्टोअर्सची कल्पना शरद जोशींनी मांडली. ती पुढे सर्वमान्य झाली; पण शेतकऱ्यांना

“

१९९१ नंतर आधुनिक अध्यात्माचा उत्कर्ष व सामाजिक संस्था, संघटनांच्या ऱ्हासाची सुरुवात एकाच वेळी झाली. सामाजिक संस्था, संघटनांकडे असणारा वर्ग आधुनिक अध्यात्माकडे वळला आहे.

जनशक्ती वाचक चळवळीने 'समग्र शरद जोशी' पुस्तकांचे प्रकाशन केले. समाधान वाटले; पण चळवळ ऐन भरात असताना ही पुस्तके का उपलब्ध झाली नाही? याबाबत आश्चर्य वाटते! चळवळ जोरात असताना या मुद्द्याकडे दुर्लक्ष झाले. समाजाचा ओपिनिअन मेकर दूर राहिला. ही पुस्तके त्याच वेळेस आली असती तर शेतकरी संघटनेचे आयुष्य आणखी दहा वर्षांनी वाढले असते.

साप्ताहीक साधनाने शेती व शेतकरी या विषयांवर विशेषांक काढला होता. मेधा पाटकर 'आंदोलन' चालवतात. अशी साप्ताहीके मासिके तेच तेच लोक सोडून दुसरे लोक किती वाचतात हा अभ्यासाचा विषय आहे. चळवळी, आंदोलनातील लोकांना रोज परीक्षा द्यावी लागत नाही. माध्यमांतील लोकांना रोज परीक्षा द्यावी लागते. माझ्या मते प्रसारमाध्यमांचा उपयोग करून घेण्यास चळवळीतील लोक कमी पडतात. - **अजित नरदे**



त्याचा फायदा घेता आला नाही. २००० सालापर्यंत शेतकरी संघटनेची भूमिका व २००० ते २०११ची भूमिका यांत विसंगती निर्माण झाली. १९८० साली 'शेतीमालाला रास्त भाव' हा एककलमी कार्यक्रम होता. नंतर पुढे शेतकरी संघटना जैविक तंत्रज्ञान, जीएम बियाणे, बीटी कॉटन, बीटी वांगे यांचे समर्थन करू लागली. बीटी कॉटनमुळे कापूस उत्पादनात दुपटीपेक्षा जास्त वाढ झाली. विजय जावंधिया, किशोर तिवारी, पी. साईनाथ 'बीटी कॉटन इज सुसाईड सीड' अशा घोषणा देतात; पण स्वतःच्या शेतात मात्र बीटी कॉटनचीच पेरणी करतात.

पूर्वी आमच्याकडची वर्तमानपत्रे साखर कारखानदारांच्या पैशांवर चालायची, आता वाचकाच्या आवडीनुसार चालतात. २००० पर्यंत मी संघटनेचा सक्रीय कार्यकर्ता होतो नंतर 'शुगर इंडिया' या अंकाचे मी काम पाहू लागलो. शेतकरी संघटनेत एवढी माणसे असून आपल्याला मान्यता मिळाली नाही, पण विजय जावंधिया यांच्या मागे मूठभर माणसे असून त्यांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. आपण मार्क्सवाद्यांसारखे मोर्चे काढत बसू नये, असे मला वाटते.

१९९० साली भारताने जागतिक बँकेकडे कर्ज मागितले तेव्हा त्यांनी समाजवादी दारू सोडण्याची अट घातली. तेव्हा उदारीकरणाचा उदय होत होता. बीटी कॉटनमधील जीन माणसांसाठी, जनावरांसाठी अपायकारक नाही हे संशोधनातून सिद्ध झाले. आता बीटी वांग्याचेही संशोधन झाले. त्यामध्येही माणसासाठी अपायकारक काही नाही हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. प्रसारमाध्यमांनी अण्णा हजारेंना १० दिवस जाहिराती बंद करून प्रसिद्धी दिली. पवनचक्क्यांमुळे पाऊस कमी पडेल असा पर्यावरणवादी गैरसमज पसरवायचे; पण पवनचक्क्या बसवल्या त्याच भागात २००५-०६ साली खूप पाऊस झाला व पिके वाहून गेली तेव्हा पर्यावरणवादींचे चेहरे पाहण्यासारखे झाले होते. शेतकरी संघटनेचा नेहमीच तंत्रज्ञानाला पाठींबा राहिला आहे.

### मा. खा. शरद जोशी

६ एप्रिल ही तारीख माझ्या अंगावर शहारे आणणारी तारीख आहे. कारण ५ एप्रिल १९८१ रोजी पोलिसांनी निपाणी येथे मला अटक केली व हुबळी येथे जेलमध्ये टाकले. नंतर त्या निपाणी आंदोलन नगरीत शेतकऱ्यांवर बेछूट गोळीबार केला व १२ शेतकरी हुतात्मा झाले. म्हणून त्या दिवसाची आठवण येताच माझ्या अंगावर शहारे येतात. गोळीबारात दोन शेतकरी भाऊ होते. त्यांच्या घरी मी गेलो असता मी त्यांच्या आईचं सांत्वन करायच्या आधीच ती माऊली मला भरल्या गळ्यानं म्हणाली, 'भाऊ, तुरुंगात तुम्ही किती रोड झालात?' मी त्यांना म्हणालो, 'खरं तर मीच तुमचं सांत्वन करायला आलो आहे, माझी कसली काळजी करता!' त्या म्हणाल्या, 'भाऊ, मला तिसरा पोरगा असता तर तोही मी शेतकरी आंदोलनात दिला असता.' त्या माऊलीच्या वाक्याने आजही मी अस्वस्थ होतो.

राजगोपालचारींचा स्वतंत्र पक्ष या नावातून स्वतंत्र हा शब्द व 'इंडिया विरुद्ध भारत' या माझ्या मांडणीतून 'भारत' हा शब्द घेऊन मी 'स्वतंत्र भारत पक्षा'ची स्थापना केली.

मी राष्ट्रसेवा दलाचा कार्यकर्ता होतो पण साने गुरुजींच्या! साने गुरुजींच्या कवितेतील 'कोटी कोटी शेतकऱ्यांचा फणा करी शेष' तसेच समर्थ रामदासांच्या 'पिके होताची होताची, सुरू होते लुटालुटी' या ओळींमधून शेतकरी संघटनेचे तत्त्वज्ञान जन्माला आले.

मी येथं येण्याचं खरं कारण म्हणजे मागील वर्षी मी दिल्ली येथे जिन्यावरून पडल्यामुळे या कार्यक्रमास येऊ शकलो नव्हतो. मागे सांगितल्याप्रमाणे एका



**मा. खा. शरद जोशी यांचा सत्कार करताना डॉ. मानवेंद्र काचोळे, सोबत विनोद शिरसाठ**



**मा. अजित नरदे यांचा सत्कार करताना डॉ. मानवेंद्र काचोळे**



**साप्ताहीक साधनाचे कार्यकारी संपादक विनोद शिरसाठ यांचा सत्कार करताना डॉ. मानवेंद्र काचोळे**



**पाक्षिक शेतकरी संघटकचे सर्वांत जास्त वर्गणीदार केल्याबद्दल निफाड येथील ज्येष्ठ कार्यकर्ते निवृत्ती कडलग यांचा मा. खा. शरद जोशी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.**



**वर्धापन दिनाच्या कार्यक्रमास उपस्थित मान्यवर आणि शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते**



**भाषण करताना मा. खा. शरद जोशी, सोबत कार्यकारी संपादक श्रीकांत उमरीकर**

वर्षासाठी मी रजा घेतली होती व आता या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमास हजर राहिलो आहे. गेल्या वर्षभरात मी फक्त पाच सभा घेतल्या. त्याला कारण अर्थातच माझी तब्येत. शेतकरी संघटनेचा विचार हा एका धाग्याने विणलेले महावस्त्र आहे. इकडून तिकडून उचललेले तुकडे घेऊन विणलेली ही गोधडी नाही. शेतकरी संघटनेचे महावस्त्र जेव्हा मला अपुरे वाटायला लागले तेव्हा मी अध्यात्माचा विचार करायला लागलो. मनुष्याच्या जन्माचा व कर्मसिद्धांताचा संबंध यावर मी सध्या विचार करतो आहे.

आपण खुल्या व्यवस्थेचा प्रचार व प्रसार करतो, त्यामुळे स्वाभाविकच माझी अपेक्षा अशी आहे की, शेतकरी संघटक या पाक्षिकाचा अंकही त्या कसोटीवर उतरला पाहिजे. हा अंक स्टॉल सेलेबल झाला पाहिजे. शेतकरी संघटनेचं साहित्य तयार करण्याच्या दृष्टीने फारसा विचार सुरूवातीच्या काळात आम्ही केला नाही हे खरं आहे. आम्हाला असं वाटत होतं, आपण इतिहास घडवावा भविष्यातील जे कोणी राजवाडे असतील ते हा इतिहास लिहून काढतील; पण आता असं लक्षात येतं आहे की, एक कमतरता आपल्या चळवळीत राहून गेली. नजिकच्या काळात जनशक्ती वाचक चळवळीने ही पुस्तके प्रकाशित करून मोठं काम केलं आहे.

विविध सामाजिक आंदोलनांना फारसा जनप्रतिसाद नसतानाही त्यांना माध्यामांतून मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी भेटते आणि त्यांचा विचार झपाट्याने सर्वत्र पसरतो, ही कमतरता शेतकरी संघटनेच्या चळवळीत नेहमीच राहिली आहे. माध्यमांचा उपयोग चांगल्या पद्धतीने चळवळीसाठी करून घ्यावा हे आपल्याला जमले नाही, हे तर खरेच आहे. त्यामुळे आता शेतकरी संघटक या पाक्षिकाबरोबरच शेतकऱ्यांसाठीचे टीव्ही चॅनेल असावे असं मला वाटते आहे आणि त्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत.

यानंतर शेतकरी संघटक या पाक्षिकाचे सर्वांत जास्त वर्गणीदार नोंदविल्याबद्दल निफाड येथील ज्येष्ठ कार्यकर्ते निवृत्ती कर्डक यांचा पुष्पगुच्छ देऊन मा. शरद जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे निवेदन व आभार संघटकचे कार्यकारी संपादक श्रीकांत उमरीकर यांनी मानले.

कार्यक्रमास 'आधुनिक किसान'चे संपादक निशीकांत भालेराव, ज्येष्ठ पत्रकार प्रा. जयदेव डोळे, साहित्य संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. रा. रं. बोराडे, ज्येष्ठ साहित्यिक वासुदेव मुलाटे, ज्येष्ठ साहित्यिक व प्रकाशक बाबा भांड, धनंजय चिंचोलीकर, दासू वैद्य, श्याम देशपांडे, उत्तम बावस्कर, क्षेत्रीय प्रचार अधिकारी श्री. शाहू पाटोळे, महापारेषण कंपनीचे अधिक्षक अभियंता शशांक जेवळीकर, ज्येष्ठ पत्रकार दत्ता जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते अमर हबीब, गोविंदभाऊ जोशी, ॲड. अनंत उमरीकर, गुणवंत पा. हंगरगेकर, प्रकाशसिंह पाटील, कैलास तवार, सौ. जयश्री पाटील, डॉ. अप्पासाहेब कदम, जालना, श्री. पुरुषोत्तम लाहोटी, परभणी, श्री. ब. ल. तामसकर, हिंगोली, ॲड. दिनेश शर्मा, वर्धा, गंगाधर मुटे व संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■■

# अतिरेकी राबवताहेत शासनाची धोरणे

**शेती धोरणांची परिणती ही आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येत झाली आहे. कुठलेही बॉम्ब फोडणे, गोळ्या घालणे असे न करता जर हे घडत असेल तर युआरएफच्याही ही गोष्ट आता लक्षात आलेली असावी. बॉम्ब आणि बंदुका चालवण्यापेक्षा देशाच्या इतर राज्यांतून होणारी शेतीमालाची आयात थांबवणे हेच मोठे शस्त्र आहे, असे त्यांच्या लक्षात आलेले दिसते. युआरएफ ज्या पद्धतीने अतिरेकी कारवायांसाठी शेतीमालाच्या आयात बंदीचा शस्त्र म्हणून उपयोग करीत आहे, हे शस्त्र आमच्या लोकनियुक्त सरकारने गेली साठ वर्षे शेतकऱ्यांविरुद्ध वापरलेले आहे.**



**ज्ञानेश्वर शेलार**

मणिपूरमधील भूमीगत संघटना युआरएफ- युनायटेड रिव्हॉल्युशनरी फ्रण्टने नुकतेच मणिपूरची राजधानी इंफाळ येथून आपली अर्थनीती जाहीर करताना कांदा, बटाटा, लसूण, तंबाखू इत्यादी शेतमालाची देशाच्या इतर राज्यांतून आयात करू नये असा फतवा काढला आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी स्वावलंबी बनण्यासाठी हा फतवा काढण्यात आल्याचे युआरएफने म्हटले आहे. या युआरएफवर बंदी घातलेली असून ते अतिरेकी असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. ही अर्थनीती जाहीर करताना युआरएफचे प्रसिद्धी सचिव ए. के. पिबारेल यांनी जनतेने याची अंमलबजावणी केली तरच राज्याची अर्थव्यवस्था बळकट होईल, असे म्हटले आहे. राज्य स्वयंपूर्ण व्हायचे असेल, तर शेतकऱ्यांनी मणिपूरमध्येच या पिकांचे उत्पादन घ्यावे, म्हणजे इतर राज्यांतून खरेदी करण्याची वेळच येणार नाही व राज्यातून बाहेर जाणारा पैशांचा ओघ थांबेल आणि राज्याची भरभराट होईल, असे म्हटले आहे. यावर काही तज्ज्ञ मंडळींनी बंदीचा विचार केल्यास दैनंदिन जीवनावर परिणाम होणार असून असे करणे शक्य नसल्याचे म्हटले आहे. कांदा, बटाटा, लसूण, तसेच इतर बऱ्याच भाज्या मणिपूरमध्ये पिकत नाहीत. मणिपूरचे मुख्य पीक तांदूळ हे आहे. उत्तम प्रतीचा तांदूळ या राज्यात पिकतो. हेच मुख्य अन्नधान्य आहे. कांदा, बटाटा, लसूण तंबाखू व भाज्या तेथील जमीन व हवामानात पिकविणे शक्य नाही. त्यांचे उत्पादन घ्यायचे म्हटले तर ते आयातीपेक्षा निश्चितच महागात पडणार आहे. राज्याला हा आत्मघात करण्यासारखे ठरेल. जनतेची त्यामुळे कोंडी होईल असे तज्ज्ञांचे मत आहे.

संपूर्ण देशाचा विचार करता स्वातंत्र्यानंतर लगेच शेतीसाठीचे जे धोरण राबवण्यात आले ते धोरण म्हणजे सध्या युआरएफ राबवणार असलेले धोरण होय. देशभर दुष्काळ पडल्यास चाराबंदी करणे, एका राज्यातून दुसऱ्या राज्यात चारा न नेऊ देणे, धान्याची आयात थांबविणे मागील महिन्यातच कर्नाटकातून महाराष्ट्रात होणारी तांदळाची आयात थांबवण्यात आल्याचा आदेश राज्य सरकारने काढला होता. कर्नाटकापेक्षा महाराष्ट्रात अधिक भाव असल्याने हा तांदूळ महाराष्ट्रात येत होता. मुळातच कर्नाटकात भरपूर उत्पादन झाल्याने तेथे भाव पडलेले होते. तरीही महाराष्ट्रात तांदूळ आणण्यास बंदी घालण्यात आली. शेतकरी संघटनेने शेकडो बैलगाड्यांमध्ये तांदूळ भरून वाजतगाजत कर्नाटकातील शेतकऱ्यांना महाराष्ट्रात तांदूळ विकण्यासाठी घेऊन आले व ही बंदी मोडली.

साखर कारखान्यांना त्यांच्या क्षेत्रातीलच ऊस गाळप करण्याचा किंवा इतर तो कोणी पळवापळवी करून किंवा ऊसाला जास्त भाव देऊन नेऊ नये, यासाठी साखरसम्राटाच्या भल्यासाठी व आग्रहामुळे झोनबंदीचा कायदा लावण्यात आलेला होता. हे सगळ्यांना आठवत असेल. राज्याराज्यांची बात तर सोडाच; परंतु ऊस उत्पादकांना तालुक्याच्या सीमाही झोनबंदीमुळे बंद करण्यात आलेल्या होत्या. एखाद्या तालुक्यात दोन साखर कारखाने आले असतील, तर त्यांच्यासुद्धा सीमा ठरवण्यात आलेल्या होत्या. महाराष्ट्रातील नगर जिल्हा हा आशिया खंडातील एकमेव ६ सहकारी साखर कारखाने असलेला जिल्हा आहे. याचा अर्थ एकाच जिल्ह्याचे विभाजन ६ सीमांमध्ये करून झोनबंदीचा क्रूर कायदा राबवण्यात आला. ज्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये राज्यसरकारने ठरवून दिलेले असेल त्याच साखर कारखान्याला ऊस घालण्याची सक्ती शेतकऱ्यांवर करण्यात आलेली होती. अशा वेळी त्यांना काय भाव द्यावा याचे कुठलेही बंधन सहकार सम्राटांवर नव्हते. राज्य सरकार उसाचे भाव हे अतिशय तुटपुंजे ठरवित असे. असे असले तरी शेतकऱ्यांना मात्र नजिकच्या सहकारी कत्तलखान्यात आपली मान दिल्याशिवाय पर्याय नव्हता. याच एका कारणाने १९८० साली मोठ्या प्रमाणावर ऊस आंदोलन उभे राहिले. क्रमाक्रमाने झोनबंद उठविणे, लेव्हीच्या साखरेचे प्रमाण कमी करणे इत्यादी गोष्टी घडत गेल्या हे सर्वांच्याच स्मरणात आहे. युआरएफने ज्या पद्धतीने आपल्या विकासाचा मार्ग हा शेतीमालाच्या बंदीवर आणून ठेवला आहे तीच बंदी अजूनही सरकार साखरेच्या निर्यातीवर बंदी घालणे किंवा निर्यातीचा कोटा ठरवून देणे, तेही जमत नसेल तर निर्यात शुल्क मोठ्या प्रमाणावर वाढवणे यांमुळे जगातील इतर देशांना आपली साखर जागतिक बाजारपेठेत विकणे शक्य असेल, भारताची साखर मात्र निर्यात शुल्क वाढवल्यामुळे सीमेवरच एवढी महाग झाली असेल की निर्यातीचा विचार करणे शक्य नसेल. अगदी आजही साखरेवरील निर्यातबंदी ५ मार्चला लावण्यात आली. १२ मार्चला उठवण्यात आली; परंतु कोटा मात्र कमीच ठेवलेला आहे. पुन्हा निर्यात करायची तर सरकारने नवीन कोटा जाहीर केलेला नाही आणि निर्यातशुल्कही कमी केलेले नाही. पर्यायाने निर्यातबंदी उठूनही साखरेचा एक दाणाही निर्यात झालेला नाही.

कांद्याच्या बाबतीतही सरकार जेव्हा देशांतर्गत बाजारपेठेत भरपूर उत्पादन झालेले असते व रुपया दोन रुपये किलोने कांदे, शेतकरी विकत असतात तेव्हाही तिकडे निर्यातबंदी लावलेली असते. त्यासाठी आंदोलने रास्तारोको होऊन निर्यातबंदी उठविण्याचा निर्णय होईपर्यंत देशातील आयातनिर्यातीचे



व्यवहार होऊन गेलेले असतात. आपल्या कांद्याला कोणीही विचारीत नाही. गेल्या हंगामात उत्तर प्रदेशमध्ये बटाट्याचे विक्रमी उत्पादन झाले. वीस पैसे किलोने बाजारात बटाटा विकला जाऊ लागला. अर्थातच या भावाने बटाटा विकल्यास उत्पादन खर्च तर सोडाच; परंतु वाहतूक, साठवणूक, मजूरी निघणे शक्यच नव्हते. हेच काय बारदाण्याचा खर्चही भागणे शक्य नव्हते. शेवटी शेतकऱ्यांनी हजारो क्विंटल बटाटा आग्र्याच्या रस्त्यावर ओतून दिला. अशाच घटना महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये टोमॅटोच्या बाबतीत दरवर्षी घडतात. टोमॅटोला रुपया, दोन रुपये किलोचा भाव मिळू लागला की, शेतकऱ्यांमध्ये असंतोष उफाळतो. रस्त्यावर टोमॅटो फेकून दिल्याची उदाहरणे दरवर्षी घडतात.

दूध उत्पादनाला एकीकडे सरकार प्रोत्साहन देत असल्याचे चित्र उभे केले जाते. त्याच वेळी दुधाचा एक रुपया लिटरने भाव वाढवायचा असेल तर मंत्रिमंडळामध्ये वर्ष-वर्षभर खलबते चालतात, मीटिंगा होतात. एक रुपया वाढवला तर ग्राहकांचे किती नुकसान होईल, त्यांची प्रतिक्रिया काय असेल, याचा सखोल अभ्यास केला जातो. पुन्हा पुन्हा दुधाला एक रुपया वाढवायचा सरकारचा विचार आहे; परंतु त्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या पुढील बैठकीत घेतला जाणार आहे, असे सांगितले जाते. अशा अनेक बैठका होतात आणि केव्हा तरी मोठ्या मुश्किलीने वर्ष-दोन वर्षांतून एकदा एखादा रुपया भाव वाढवला जातो. शेतकरी फारच रडकुंडीला आले तर ते बिचारे रस्त्यावर दूध ओतून देणे याशिवाय दुसरे काहीही करू शकत नाही.

युआरएफला बंदी घातलेली आहे. अतिरेकी व स्फोटक कारवायांमध्ये युआरएफचा हात आहे. राज्यामध्ये वारंवार बॉम्बस्फोट घडविणे, दहशतवादी कारवाया करणे असे ही संघटना करत असते. जगभर तमीळ अतिरेकी, कश्मीरमधील फुटीरतावादी, तालिबान, उल्फा अतिरेकी, माओवादी सशस्त्र घातपात करीत असतात. बॉम्बस्फोट करणे, महत्त्वाच्या वा गर्दीच्या ठिकाणी रेल्वे, विमानतळ उडवून देणे, अपहरण करणे, विमाने पळवणे इत्यादी कारवाया चालू असतात. एवढे करूनही त्यांच्या उद्दिष्टाप्रत ते जाऊ शकत नाहीत, असे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांना आता नवीनच शस्त्र सापडले आहे आणि ते म्हणजे विशिष्ट प्रदेशात लोकांच्या येण्याजाण्यावर बंदी घालणे. त्यासाठी जातीचा, धर्माचा किंवा प्रादेशिकतेचा आधार घेणे. बिहारमधून लोकांनी महाराष्ट्रात येऊ नये, बिहारी लोकांनी बंगालमध्ये जाऊ नये असे फतवे काढले जातात. बऱ्याचदा त्यांच्यावर हल्लेही केले जातात. हेही थोडके वाटते की काय म्हणून आता या अतिरेक्यांनी शेतीमालावर आयात किंवा निर्यातबंदी घालणे असा जालीम उपाय शोधला आहे. यासाठी त्यांनी विशिष्ट प्रदेशातील शेतकऱ्यांचा विकास व्हायचा असेल, ते स्वावलंबी व्हायचे असतील, त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारायची असेल, पर्यायाने राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारायची असेल तर हा सर्वांत चांगला मार्ग असल्याचे अतिरेक्यांना वाटत आहे. शस्त्रांनीही जे घडू शकत नाही, ते आता या धोरणामुळे घडणार आहे. त्यांनी कदाचित लोकांच्या जीवनावश्यक वस्तूंवरच बंदी घातल्याने काय हाहाकार उडू शकतो आणि त्यांचे जीवन किती निकृष्ट बनू शकते, हे देशातील लोकशाही सरकारने शेतकऱ्यांसाठी साठ वर्षे राबवलेल्या शेतीधोरणाचा अभ्यास करूनच शोधले असेल. शेती धोरणांची परिणती ही आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येत झाली आहे. कुठलेही बॉम्ब फोडणे, गोळ्या घालणे असे न करता जर हे घडत असेल तर युआरएफच्याही ही गोष्ट आता लक्षात आलेली असावी. बॉम्ब आणि बंदुका चालवण्यापेक्षा देशाच्या इतर राज्यांतून होणारी शेतीमालाची आयात थांबवणे हेच मोठे शस्त्र आहे.

भारताचे अर्थशास्त्रातील एकमेव नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांना देण्यात आले. त्यांनी जो सिद्धांत मांडलेला आहे तो सिद्धांत म्हणजे जगभर दळणवळणाची क्रांती झालेली आहे. याचा अर्थ कोठलीही वस्तू जगात कोठेही जलद गतीने उपलब्ध होऊ शकते. संदेशवहनामध्ये झालेल्या क्रांतीने क्षणार्धात जगभर कोठेही संदेश पाठवला जाऊ शकतो. याच गोष्टींचा नागरिकांच्या जीवनावर परिणाम होऊन ते अधिक सुखकर झाले आहे. भूकंप, पूर, त्सुनामी, दुष्काळ इत्यादी नैसर्गिक आपत्तीच्या वेळी किंवा युद्ध घातपाती कृत्ये इत्यादींच्या वेळी संदेशवहनाने ताबडतोब या घटनांची माहिती जगभर पोहोचू शकते. वाहतुकीच्या साधनांमध्ये झालेल्या सुधारणांमुळे अशा ठिकाणी लवकरात लवकर मदत पोहोचविणेही शक्य होते. नागरिकांच्या जीवनामध्ये यांमुळे मोठा फरक पडला आहे. फक्त दुष्काळाचे उदाहरण घेतले तरी, दुष्काळी भागामध्ये जनावरांना इतर राज्यांतून तात्काळ चारा उपलब्ध करून देणे, लोकांना धान्य उपलब्ध करून देणे, अगदीच पाणी मिळत नसेल, तर पाणीसुद्धा उपलब्ध करून देणे हे शक्य होऊ शकते. नर्मदा सरोवर योजना पूर्ण होण्याअगोदर २००० साली राजस्थान आणि गुजरातचा उत्तरेकडील भाग येथे तीव्र दुष्काळ पडला होता त्यावेळी भडोचहून रेल्वेच्या वॅगनने या भागांत पाणी पोहोचविल्याची आपल्या देशातीलच उदाहरणे आहे. नांदेडच्या शेतकऱ्यांनी रेल्वेने गायी-गुरांना चाराही पोहोचवला होता. अगदीच पोट भरत नसेल, तर दुष्काळापुरते जिथे कुठे दोन घास मिळतील त्या ठिकाणी पोट भरण्यासाठी जाण्याचा पर्याय तरी लोकांसमोर उपलब्ध असतो. अमर्त्य सेन यांनी मांडलेला आणि जागतिक मान्यता मिळालेला हा सिद्धांत आपल्या देशाच्या मात्र पचनी पडलेला नाही. अजूनही जिल्ह्याच्या, राज्याच्या आणि देशाच्याही सीमा काही ना काही कारणांनी आयातीसाठी किंवा निर्यातीसाठी बंदीस्त करून ठेवायचा खटाटोप सरकार सतत करीत आहे. शस्त्रास्त्रे, विमाने, दारूगोळा, बॉम्ब, रणगाडे हे सर्व परदेशातून आणायचे. त्यातून मोठ्या प्रमाणावर दलाली खायची. मात्र शेतीमालाला बंदी घालायची. ते जमत नसेल तर आपल्याला कोठे हात मारता येईल त्या ठिकाणी ढिल द्यायची आणि आयातीचा किंवा निर्यातीचा सोयीप्रमाणे निर्णय घ्यायचा. युआरएफ ज्या पद्धतीने अतिरेकी कारवायांसाठी शेतीमालाच्या आयात बंदीचा शस्त्र म्हणून उपयोग करीत आहे, हे शस्त्र आमच्या लोकनियुक्त सरकारने गेली साठ वर्षे शेतकऱ्यांविरुद्ध वापरलेले आहे.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# भुरट्याला तुरा, तर पोशिंद्याला धतुरा

> मॉडेल ॲक्टनुसार या बंदिस्त बाजार व्यवस्थेला पर्याय उभा करण्यात शासनाला अपयश आल्याने व्यापारी शेतमालाची कोंडी करू शकतात. याही वेळेला शेतकरी हिताची ढाल पुढे करत शेतकरी व ग्राहकांच्या दृष्टीने ही सुवर्णसंधी आपण गमावतो की काय, अशी परिस्थिती आहे. शेतकऱ्याच्या वैध व न्याय्य मागण्यांच्या आंदोलनावर लाठीमारच नव्हे तर गोळीबारही करणारे सरकार या बेकायदेशीर संपाबाबत काय भूमिका घेते यावरच शासनाचे खरे दात दिसू शकतील. सरकारची ही ढिलाई शेतकरी व ग्राहक हिताच्या मूळावर उठणारी असल्याने शासनाने या वेळी कणखर भूमिका घ्यावी.



गिरधर पाटील

आजवर उत्पादक शेतकरी व ग्राहक उपभोक्ता या दोघांची कोंडी करणारा बाजार समिती कायदा काहीसा शिथिल करत काही भाज्या व फळे दलालांच्या कचाट्यातून सोडवण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला. शासनाला हा निर्णय स्थानिक चळवळींच्या दबावाबरोबर जागतिक व्यापार कराराच्या अटी पाळण्याच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून स्वीकारावा लागला असला तरी याच सदरातून या निर्णयाचे पुढे काय होणार याची साधार भीती आम्ही मागच्या आठवड्यात व्यक्त केली होती. त्यानुसार व्यापारी-हमाल-मापारी-माथाडी यांनी या निर्णयाला विरोध दर्शवत थेट संपाचीच हाळी दिल्याने याबाबत शासनाची काय भूमिका राहणार आहे यावर या निर्णयाचे भवितव्य ठरणार आहे.

आजवर शासनाने (वरवर का होईना) शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतल्याचे अनेक यशस्वी प्रयोग या प्रभावी लॉबीने नेस्तनाबूत केले असून दर वेळेला शासनाची भूमिका बोटचेपेपणाची राहिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवरचा अन्याय कायम राखत आज काट्याचा नायटा होत, या लॉबीचा भस्मासूर झालेला दिसतो. अर्थात शासनव्यवस्थेचे विशेषतः पणन व सहकार खात्याचे स्वारस्य निर्माण झाल्याने कुठल्याही बदलाच्या वेळी शासन अगं अगं म्हशी, मला कुठे नेशी या न्यायानुसार या लॉबीमागे फरपटत जात असते. वास्तवात मूळात शेतकऱ्यांसाठी व त्यांच्या शेतमाल विक्रीसाठी स्थापन झालेल्या या व्यवस्थेत शेतकरीहित दुर्लक्षून यावर पोट भरणाऱ्या बांडगुळांची दडपशाही व अरेरावी आज साऱ्यांना सोसावी लागते आहे. घर राखण्यासाठी कुत्रा पाळावा आणि या कुत्र्यानेच शिरजोर होत मालकाच्या थाळीवर हल्ला करावा, असा हा सारा प्रकार आहे.

व्यापारी-हमाल-मापारी-माथाडी या साऱ्या शेतमाल विक्रीत सेवा बजावणाऱ्या आनुषंगिक उपसंस्था आहेत. कायद्यात विहित केल्यानुसार त्यांचा मेहनताना, अधिकारही निश्चित केलेला आहे. त्यांनी या व्यवस्थेत सेवा बजावाव्यात, असे कुठलेही बंधन वा जबरदस्ती त्यांच्यावर नाही. मालकाला जर सेवा नको असतील तर त्या घेतल्याच पाहिजेत, असा नोकराचा अट्टहास का असावा? आपल्या या वैध अधिकारांबरोबर उपलब्ध झालेल्या एकाधिकारामुळे व शेतकऱ्यांच्याच एकंदरीत अज्ञान व असंघटितपणामुळे दाराशी चालून आलेला शेतमाल कवडीमोल भावात हडप करण्याची संधी व चटक या घटकांना लागल्याने शेतकऱ्यांना काही फायदा न होता या एकाधिकारावर ही सारी मंडळी गडगंज झाली आहे. त्यातून निर्माण झालेल्या ताकदीवर शासनव्यवस्था नियंत्रित करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. या दडपशाहीतून अनेक अनुचित व्यापारी प्रथा जसे ढिगाने लिलाव, रुमालाआड सौदे, शंभरावर सात ते दहा जुड्या फुकट, विकलेल्या मालाचा गैरहिशेब व पैसे वेळेवर न देणे, प्रसंगी बुडवणे असे सर्रास लूटमारसदृश वातावरण साऱ्या शेतमाल बाजारात स्थिरावले असून त्याबद्दल कोणाला विशेषतः शासनाला सोयरसूतक वाटत नाही. याला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर जीवघेणे हल्ले झाल्याची अनेक उदाहरणे असली तरी संबंधितांवर काही कारवाई झाल्याचे ऐकिवात नाही. मानवाधिकार आयोगानेही यावर ताशेरे ओढले आहेत.

मॉडेल ॲक्टनुसार या बंदिस्त बाजार व्यवस्थेला पर्याय उभा करण्यात शासनाला अपयश आल्याने व्यापारी शेतमालाची कोंडी करू शकतात. याही वेळेला शेतकरी हिताची ढाल पुढे करत शेतकरी व ग्राहकांच्या दृष्टीने ही सुवर्णसंधी आपण गमावतो की काय, अशी परिस्थिती आहे. शेतकऱ्याच्या वैध व न्याय्य मागण्यांच्या आंदोलनावर लाठीमारच नव्हे तर गोळीबारही करणारे सरकार या बेकायदेशीर संपाबाबत काय भूमिका घेते यावरच शासनाचे खरे दात दिसू शकतील. सरकारची ही ढिलाई शेतकरी व ग्राहक हिताच्या मूळावर उठणारी असल्याने शासनाने या वेळी कणखर भूमिका घ्यावी.

या वेळी शासनाने या संपाला मूळीच भीक घालू नये. काही व्यापारी व त्यांचे बगलबच्चे संपावर गेल्याने शेतमाल बाजार कोसळून पडणार नाही. मात्र, एक खबरदारी शासनाने जरूर घ्यावी की जे व्यापारी वा माथाडी संपावर जातील त्यांचे परवाने रद्द करण्यात येतील असे नुसते जाहिरच नव्हे तर तशी कारवाईही प्रत्यक्षात करावी. दंतकथेतल्या राजाचा जीव जसा पोपटात असतो तसा या साऱ्यांचा जीव या परवान्यात असतो. मागच्या अनेक आंदोलनांत शेतकरी संघटनेने यांचे नुसते परवाने रद्द करण्याची मागणी केली होती, हे सारे घटक निमूटपणे दुसऱ्याच दिवशी कामावर हजर झाले होते.

शेतकरी हा एक राष्ट्रीय उत्पन्नात भर घालणारा व जगाचा पोशिंदा आहे. त्याला एक उत्पादक म्हणून प्रोत्साहन देण्याऐवजी या भुरट्या चोरांच्या हाती सोपवणे म्हणजे आपल्याच पोटावर धोंडा मारून घेण्यासारखे आहे. तुम्हाला काय वाटते?

■■

# साहेब, आता आपलं व्हावं तरी कसं?

समदा पचका झाला, इचकूल गेलं की हो साहेब! असं झालंच कसं म्हंतो मी. म्हंजी असं बघा, वर आपुन, मधात बी आपुन अन् खाली बी आपुनंच. तेच्यावर समद्या सोसायट्या, बँका, साखर कारखाने, समदे आपले. भरीस भर म्हंजी ते समदे सम्राट, साखर सम्राट, शिक्षण सम्राट, झालंच तर वाळू माफिया, घासलेट माफिया, राशन माफिया बी आपलेच. पैशाची तर बातच न्हाई, निसता पूर है पैशाचा! एवढं समदं हाताशी व्हतं, तरी मंग असं झालंच कसं म्हंतो मी! सायेब, जिथं सोनं लुटलं तिथं आता तर गोवऱ्या बी वेचाया मिळणार न्हाई, त्याबी आता सोन्याच्या भावानं चालल्यात!

न्हाई, त्या 'तिकडं' बोऱ्या वाजला आपला ते एक परता ठीक होतं. आपन आपल्याच गुनानं मेलो. आपल्या आघाडीत एका परता एक नग, त्यो दिग्गीराजा, खलमान सुर्शीद, प्रेनी बसाद, सपिल किब्बल, संबिका ओनी, कित्ती म्हूनशान नावं घेऊ. आता त्या 'हाताच' काय व्हायचं ते होऊ द्या हो. पन आपल्या 'घड्याळा'चं काय व्हावं म्हंतू म्या. आता तर आपली लफडी भाईर यायलीत. त्या भगन छुजबळची नाशकातली 'ज्ञाननगरी' अन् 'भारतीय बैला'ची भानगड गाजायली. टग्या दादाच्या कहान्या ऐकून तर साहेब, तुम्हीबी हात टेकलेत; पन काईबी झालं तरी टग्या म्हंजी अवघड जागीचं दुखनं. आपले अमरावतीचे मानेंद्र रुळीक तर 'कोटीच्या' लफड्यात निवडणूक आयोगाकडे अडकलेत. तेहच्या वर तुर्फा म्हंजी आपले ते मर्द, नवीर, शूर तानकर खटल्यातून सही सलामत भाईर तर पडलेतंच शिवाय टग्या दादानं तेहला उपमहापौर करून शिक्कामोर्तब केलंय. आपल्या पक्षाच्या पुढच्या 'अर्थपूर्ण' वाटचालीवर आता ह्यो कोर्टातून भला सुटला असन; पन लोकांच्या नजरतून कसा सुटन? तवा मी म्हंतो सायेब, आपलं आता व्हावं कसं?

तुमचे एक बरं हाय सायेब, लई मायापुंजी करून ठुली, तवा आपल्या 'घडाळा'चं काई भलं बुरं झालं तर तुमचा बालबी बाका हुनार न्हाई. तुमचाच, काय पर आपल्या घड्याळातले समदे छोटे मोठे आकडे तुमच्या पावलावर पाऊल ठेवून गब्बर झालेत. पर आम्ही म्हंजी तुमच्या 'घड्याळाची' टिकटिक ती बंद पडली तर आमचं काय व्हावं म्हंतो मी. आम्ही 'जिंदाबाद-मुर्दाबाद' करत तुमच्या मागं मागं फिरलोत. दो वेळची रोटी, मटनाच्या डल्या अन् एखादा खंबा एवढ्यावर उड्या मारनारे आम्ही. तुमचे 'काटे' थांबले, की लोक आम्हाला खेटरंच मारनार. आम्हाला तर सायेब याचे लक्षण इलेक्शनमध्येच दिसू लागले व्हते. गावागावातल्या आपल्या लीडर पुढाऱ्याची भली भारी कमाई लोकांच्या नजरत भरली होती. आम्हाला आता भेव वाटायलंय, हे असंच चालू राह्यलं तर येत्या बारीला आपलं कांडच वाजन. तवा म्या म्हंतो, सायेब आपलं कसं व्हावं.

उजुक एक बात अडवायली सायेब. लोक आता इचारायलेत मुंबईत आपलं 'घड्याळ', 'हाता' संग एकत्र, मात्तर पिंपरी चिंचवडला आपन दोगंबी 'दोघत्र', नाशकात 'दोघत्र' कुठं कुठं 'दोघत्र', कुठं कुठं 'एकत्र' म्हंजी काय कुठं कुठं आपन 'मर्द' कुठं कुठं आपन 'बाया मानसं' अन् कुठं कुठं आपन 'तसले' मानसं हायेत का? बरं झालं गेलं पार पडलं म्हनावं तर पदासाठी आपन कधी याच्या संगं, कधी त्येच्या संग, म्हंजी गावातल्या 'जान्या' गायीसारखेच म्हना की! कुनीबी 'मालक' नसलेले! आता पऱ्चार करायचा तरी कसा म्हंतो म्या. बगा कसं, व्हायलंय, नदीच्या अराड आमी म्हनणार, 'घड्याळ हातात, नशीब जोरात!' अन् नदीच्या पराड आमी म्हननार, 'मायला त्या हाताच्या, समदा इचका केला देशाचा!' अराड आमी 'जय' म्हनलो, की पराड ते 'मुर्दाबाद' म्हननार! तवा म्या म्हनतू सायेब, आपलं व्हावं तरी कसं? या वक्ताला कसंबसं जमलंय सायेब; पन काळजी हाय ती म्होरल्या विलेक्शनची. आमी समद्यांनी एक सपान उरात ठुलंय सायेब. इतिहासात जे जमले नाही ते. आपले पेशवे गेल्ते धडक द्यायला दिल्लीला, पर वापस आले, दिल्लीचं तख्त हालवलं तेहनी पर त्यावर बसले नाही. आपल्या यशवंतरावाचंबी तसंच झालं. आता निदान तुमी तरी दिल्लीच्या गादीवर बसावं म्हंजी आमच्या पिंडाला कावळा शिवन; पन ते सपान जरा अवघड वाटायलंय. आमच्या शेजारचा विळा हातोडावाला म्हंतोय, ''इसरा दिल्ली, आता गल्लीत तरी तुमी राहताय का नाही!'' त्यो फुडं असंबी म्हनला, ''डोंगराकडच्या राज्यात 'घड्याळ' तर औषदालाबी नव्हतं अन् आताबी न्हाई; पन ज्या 'हातात' घड्याळ बांधलेलं होतं त्यो हातंच जनतेनं खांद्यापासून उखडून काढला. आता ती बारीक चीज मोठं करून पहायची काच असती ना, त्या काचेतून 'घड्याळ' 'हाताला' पाहावं लागलं!'' तवापासून सायेब, काळीज लई कापायलंय, कसं व्हावं आपलं!

ऐकावं ते इपरितच! परवा कॉलेजमधला एक मास्तर आल्ता शेजारच्या घरी. दोघं तिघं मास्तर होते. तेहच्या गप्पा ऐकिल्या, ते तर म्हनू लागले आता मुलायम, शरद यादव, नितीश, ममता, जयललिता, चंद्राबाबू समदे मिळून तिसरी का चौथी आघाडी करायलेत. तुमी तेहच्या संगट गेलात तरी दिल्लीचं तख्त काही मिळत न्हाई अन् 'हाता' संग गेले तरीबी न्हाईच. बरं 'हाता' संग ऱ्हायलात तर सरळ बारामतीला न्हाई तर 'लवाशा'त परतावं लागन. आता तुमचीबी खैर न्हाई अन् 'हाताची'बी न्हाई! न्हाई म्हंजी मी असं म्हनना, ते मास्तर लोक म्हनू लागले. आज मास्तर म्हनले, उद्या गल्ली म्हनल अन् मंग गावच्या गाव म्हनतील, म्हनून म्हंतो मी सायेब, आपलं कसं व्हावं?


कायबी म्हना सायेब, एक पाय चिखलातून काढावा तो दुसरा पाय चिखलात, असं व्हायलंय बगा आपलं. एका लफड्यातून आपल्या लिडराला भाईर काढावं तर दुसरा अडकायलाय. एक भानगड निस्तरावी तर दुसरी मान वर करतीया अन् काय हो, ह्यो कापसाचा काय तीढा हाय? लोक इच्चारायलेत, तुमच्या सायेबाच्या हातात शेती खातं हाय म्हंजी काय निसतं 'खातंच' बसायचं की काय? न्हाई, म्हंजी कापसाची काय भानगड हाय? आपल्याला काई उमगना. आमी आपले खेडे के येडे. आमाला हे कळना. सरकार म्हंतं, कारखान्यानी तेहचा माल निर्यात करावा, म्हनूनशान सरकार तेहला बक्षीस देतंय. मंग आपले शेतकरी आपला माल भाईर पाठवायलेत तर तेहला हेच सरकार बक्षीस देणं तर सोडाच; पन खेटरं कामून मारायलेत. ते लाल बिल्लेवाले विचारायलेत, शेतीमाल भाईर पाठवला तर देशाला भाईरची करन्शी मिळणार हाय, शेतकऱ्याला सूट देऊ नका, फकस्त एक करा, त्याच्या छातीवर बसू नका, तेला आडवू नका. तेला माल भाईर पाठवायचा हाय तर पाठवू द्या. एक परता त्याच्या पाठीवर मारा, पर पोटावर मारू नका. शेतीमंत्री तर तुमचे सायेब हायेत मंग माल भाईर पाठवायला बंदी कामून? ते इच्यारतेत, कापसाचे भाव पाडून तुमचे सायेब कोनाचं घर भरायलेत?

व्हय सायेब, खरं हाय का हे? जर असन तर तुमी भांडन का न्हाई करत? आखर तुमी शेतकऱ्याची औलाद हायेत तर शेतकऱ्यासाठी भांडन करा. अहो, एका मागं एक शेतकरी बरबाद व्हायलाय. परवाच कांद्याच्या ढिगावर एका शेतकऱ्यानं जीव दिला. कापसाचे भाव पडले म्हनून दुसऱ्यानं जीव दिला सायेब. एक डाव मर्दासारखं हाबूक ठोका, तुमच्या थोरल्या पातीशी भांडा अन् राजीनामा द्या अन् परता घराकडं. न्हाई तरी या आघाडीचे दिवस भरलेच हत, असे समदे म्हनायलेत. तवा आमचं ऐका, न्हाई तर तुम्ही सांगा, तुमचं काय व्हायचं ते होईल; पन आमचं कसं व्हावं?

■■

# खुज्या नेतृत्वाचा देश

स्वातंत्र्यानंतर राजकीय नेतृत्वावरील लोकांचा विश्वास रसातळाला गेल्याचा कालखंड देश प्रथमच अनुभवतो आहे. राजकीय नेतृत्वाचा अभाव जाणवण्या इतपत राजकीय नेतृत्व क्षीण असले की इतर क्षेत्रातील नेतृत्व कसे बेलगाम होते हे मागच्या दोन वर्षांच्या काळात देशाने अनुभवले आहे. अशा बेलगाम नेतृत्वाचा भयभीत करणारा अनुभव देशाच्या लष्कराचे नेतृत्व करणाऱ्या लष्करप्रमुखाने नुकताच देऊन देशात नेतृत्वाचे संकट असल्याचे दाखवून दिले आहे.



सुधाकर जाधव

मनोरंजन वाहिन्यांच्या आक्रमणापूर्वी कुमार गटातील मुलाच्या मनोरंजनासाठी गोष्टीच्या पुस्तकांना पर्याय नव्हता. अशाच पुस्तकात लोकप्रियतेत बऱ्याच वरच्या स्थानी 'सिंदबादच्या सात सफरी' होत्या. या सफरींमध्ये सिंदबाद अशा विचित्र लोकांच्या देशात पोचतो त्या देशातील लोकांची उंची अत्यंत कमी म्हणजे काही इंचच होती. बुटक्यांचा किंवा एटू लोकांचा तो देश होता. आज आपल्या देशातील सर्व क्षेत्रांतील आणि सर्व थरातील नेतृत्व पाहिले की त्या बुटक्यांच्या देशाची आठवण कोणालाही येईल. खरे तर या दोन्हीची तुलना नाही होऊ शकत. ते बुटके होते तरी पराक्रमी असल्याचे त्या कथेत सांगितले होते. ते फक्त शारीरिकदृष्ट्या बुटके होते. आपले नेते शारीरिकदृष्ट्या बुटके नाहीत अगदी सिंदबादसारखे उंचेपुरे आहेत; पण कर्तृत्वाच्या बाबतीत देशातील आजचे नेतृत्व 'न भूतो न भविष्यती' इतके खुजे आहे. सिंदबादच्या सात सफरींचे वर्णन करणारा लेखक आज जिवंत असता तर त्याने आजच्या भारताकडे बघून 'खुज्या नेतृत्वाचा देश' असे तितकेच रंगतदार पुस्तक लिहिले असते. या देशात बुद्ध, राजा अशोक, राजा अकबर, राजा शिवाजी किंवा अगदी आधुनिक काळातील फुले, आंबेडकर, गांधी, लोहिया, जयप्रकाश हे उत्तुंग उंचीचे नेते होऊन गेले आहेत; पण हे महात्मे तर सोडाच नेहरू-इंदिरा किंवा अटल बिहारी यांच्या पासंगाला पुरेल असे नेतृत्व आज देशात नाही. या देशाला ज्यांनी समर्थ नेतृत्व दिले तीही नावे अगदी सिंदबादच्या सफरीसारख्या दंतकथा वाटू लागल्या आहेत. आजकाल शालेय स्नेह संमेलनात सर्वत्र वेशभूषा स्पर्धा होत असतात. त्या स्पर्धांमध्ये कोणीही कोणाची नक्कल करू शकतो. त्यासाठी कोणत्या योग्यतेची किंवा पात्रतेची गरज नसते. आपल्या देशातील आजचे नेतृत्व हे असेच वेशभूषा स्पर्धेत साकारल्या जाणाऱ्या नकली नेतृत्वासारखे आहे. वेशभूषा स्पर्धेच्या रुपात आजच्या नेतृत्वाकडे पाहिले की, पवार शिवाजी बनलेले आहेत, अण्णा हजारे गांधी वाटू लागतात, राहुल गांधी नेहरूंचा पोशाख परिधान करतात, रामदास आठवले आंबेडकर तर भुजबळ फुले साकारताना दिसतात! वेशभूषा स्पर्धा पाहताना किमान हसून टाळ्या वाजविता येतात; पण प्रत्यक्षातील हे नेतृत्व पाहिले की, आपोआपच कपाळावर हात मारल्या जातो. अबोध बालकांनी अशा नेत्यांची नक्कल कौतुकाची थाप देऊन जाते; पण अशा धेंडांनी केलेली नक्कल पाहून अहिंसेवर विश्वास असलेल्या व्यक्तीलाही धोंडा हाती घ्यावासा वाटला तर नवल वाटायला नको. राजकीय नेतृत्व या ना त्या कारणाने दैनंदिन आपल्या समोर येत असल्याने त्यांचा खुजेपणा चटकन सगळ्यांच्या डोळ्यात भरतो; पण प्रसंगपरत्वे इतर क्षेत्रांतील नेतृत्वांनी उधळलेले गुण पाहिले की आपल्या देशात नेतृत्वाची खुजेपणाची कमाल पातळी कोण गाठतो याचीच स्पर्धा चालू असल्याची प्रचिती येते.

**राजकीय नेतृत्वाची दुर्दशा**

जनतेशी नाळ जोडलेली असणे हे राजकीय नेतृत्वाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. अशी नाळ जोडलेली असल्यानेच जगात लोकहितकारी बदल राजकीय नेतृत्वाकडून राजकीय निर्णयाद्वारे होत आले आहेत. देशातील आजच्या राजकीय नेतृत्वाचा जनतेशी काही संबंध उरला आहे असे दिसत नाही. सत्ताधाऱ्यांचा नाहीच नाही; पण विरोधकांच्या भूमिकेत असलेल्यांचाही नाही. सत्ताधाऱ्यांचे नेतृत्व जसा एक नोकरशहा करतो आहे तसेच प्रमुख विरोधी पक्षाचे नेतृत्व ही लोकांतून वर आलेले नसून ते एखाद्या नियुक्त कार्यकारी अधिकाऱ्यासारखे आहे. उर्वरित राजकीय नेतृत्व एक तर जाती आणि भाषेच्या बंधनात अडकून आहे किंवा पोथीनिष्ठ आहे. अशा नेतृत्वाची निष्ठा लोकांशी नाही तर जाती, भाषा आणि पोथीशी आहे. त्यामुळे देशातील जनतेच्या नाडीवर हात असलेले राजकीय नेतृत्वच आज देशात अस्तित्वात नाही. इतर क्षेत्रातील नेतृत्वाच्या अंगभूत मर्यादा असतात. त्यांच्याकडून त्यांच्या क्षेत्रातील उत्तम कामगिरीची अपेक्षा करता येत असली तरी जनसामान्यांशी निगडीत निर्णय नेहमीच राजकीय नेतृत्वाकडून अपेक्षित असतात; पण आज असे काहीच निर्णय होताना दिसत नाही याचे कारण देशाला आज राजकीय नेतृत्वच नाही हे आहे. जनतेशी जोडलेले राजकीय नेतृत्व आणि राजकीय नेतृत्वाशी जोडलेले इतर क्षेत्रातील नेतृत्व यांच्यातील समन्वयाने देशाचा कारभार चालत असतो. देशाची दशा आणि दिशा भरकटलेली असण्यामागे नेतृत्वाच्या साखळीतील प्रमुख दुवा असलेले राजकीय नेतृत्व एक तर अस्तित्वात नाही किंवा ही साखळी जोडून ठेवण्याची ताकद आणि कुवत त्यांच्यात उरलेली नाही. स्वातंत्र्यानंतर राजकीय नेतृत्वावरील लोकांचा विश्वास रसातळाला गेल्याचा कालखंड देश प्रथमच अनुभवतो आहे. राजकीय नेतृत्वाचा अभाव जाणवण्या इतपत राजकीय नेतृत्व क्षीण असले की इतर क्षेत्रातील नेतृत्व कसे बेलगाम होते हे मागच्या दोन वर्षांच्या काळात देशाने अनुभवले आहे. अशा बेलगाम नेतृत्वाचा भयभीत करणारा अनुभव देशाच्या लष्कराचे नेतृत्व करणाऱ्या लष्करप्रमुखाने नुकताच देऊन देशात नेतृत्वाचे संकट असल्याचे दाखवून दिले आहे.

**बिगर राजकीय नेतृत्व बेलगाम**

भारताला आपण अध्यात्मिक क्षेत्रात जगाचे गुरू आहोत असा भास



नेहमीच होत आला आहे; पण त्या क्षेत्रातले नेतृत्व किती दिवाळखोर आहे हे रविशंकर महाराजांच्या सरकारी शाळेत नक्षलवादी तयार होतात या वक्तव्यावरून लक्षात येते. कर न भरता आपल्या शयनगृहात सोने लपविणारे बाबा आणि त्याच्या चरणी लिन होणारे देशाचे सर्वच थरांतील व क्षेत्रांतील नेतृत्व पाहिले की, आपल्या देशाचे नेतृत्व काय लायकीचे आहे हे लक्षात येते.

भारताचे लष्कर हे भारतवासीयांसाठी नेहमीच आदर, कौतुक आणि अभिमानाचे केंद्र राहिले आहे. १९६२ च्या चिनी आक्रमणाचा अपवाद वगळता भारतीय लष्कराने नेहमीच देशवासियांचा अभिमान सार्थ ठरविला आहे. देशाची सर्वांत मोठी खरेदी संरक्षण साहित्याची होते आणि या खरेदीतील भ्रष्टाचार सर्वविदीत असतानाही त्याबद्दल अण्णामंडळीसह कोणाचीच ओरड नसते याला कारण लष्कराने भारतीय जनमानसात मिळविलेले स्थान आहे. चीन आणि अमेरिका आणि रशिया नंतरचे जगातील मोठे आणि शक्तिशाली लष्कर म्हणून भारतीय लष्कराची ओळख आहे. अशा लष्कराच्या प्रमुखपदी जो व्यक्ती बसते त्या व्यक्तीची गणना शक्तिशाली व्यक्ती म्हणूनच होते आणि तरीही युद्धाचे दिवस वगळता त्या पदी कोण असते आणि बसते याबाबत जनतेत कधीच औत्सुक्य नसते; पण सध्याचे लष्करप्रमुख त्याला अपवाद आहेत. पहिल्यांदाच देशाने लष्करप्रमुख आणि सरकार यांच्यातील वाद आणि संघर्ष अनुभवला. राजकीय नेतृत्व खुजे आणि दुबळे असले की, अन्य क्षेत्रातील नेतृत्व कसे बेलगाम होते हे जनरल व्ही. के. सिंह यांनी आपल्या कृतीने दाखवून दिले आहे. या महाशयांनी आधी जन्म तारखेचा घोळ घालून अधिक दिवस या पदावर मांड ठोकून बसण्याचा प्रयत्न केला. तो फसल्यानंतर बदला घेण्यासाठी भारताच्या संरक्षण सिद्धतेचे वाभाडे काढणारे पत्र पंतप्रधानांना लिहिले. इतके वर्ष लष्करात महत्त्वाची पदे भूषविल्यानंतर निवृत्त होताना भारतीय लष्कर म्हणजे पोकळ डोलारा असल्याचे सांगितले. त्यांना भारत सरकारची बेअब्रू करायची होती एवढाच त्या पत्राचा हेतू होता. कारण या पत्राचा पाहिजे तसा परिणाम झाल्यावर याच महाशयांनी लष्कर कोणत्याही स्थितीचा मुकाबला करण्यासाठी सज्ज असल्याचे घोषित केले - पत्रातील मजकुराच्या अगदी उलट! लष्करप्रमुखांचे वागणे आणि कृती बेलगाम असल्याचे सिद्ध होऊनही त्यांना हात लावायची सरकारची हिंमत झाली नाही. अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांनी लष्करप्रमुखांच्या हकालपट्टीची मागणी करूनही सरकारला नेहमीप्रमाणे निर्णय घेता आला नाही. जानेवारी महिन्यात दिल्लीच्या दिशेने लष्कराच्या दोन तुकड्या निघाल्या होत्या हे गंभीर वृत्त ही हकालपट्टी किती गरजेची होती आणि लष्करावरील राजकीय नेतृत्व कसे सैल होत चालले आहे याचेच निदर्शक आहे. देश पाकिस्तानच्या वाटेने निघाल्याची ही भयसूचक घंटा आहे. खुज्या नेतृत्वाने देशाची सुरक्षा आणि लोकतंत्र या दोहोंनाही धोका निर्माण झाला आहे.

लष्करा इतकेच महत्त्वाचे आणि लोकांच्या आदरास पात्र असलेले दुसरे क्षेत्र न्यायालयाचे आहे. शक्तिशाली व सर्व अधिकार संपन्न सरकारपासून लोकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी या क्षेत्रावर येते. पण या क्षेत्राचे नेतृत्व करीत असलेले सर्वोच्च न्यायालय म्हणजे येता-जाता सरकारला टपल्या मारण्याचे ठिकाण बनले आहे. लोकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याऐवजी सर्वोच्च न्यायालयासह खालची न्यायालये लोकांना अटक करण्याचे आदेश देत सुटले आहेत. अटकेविरुद्ध हक्काने जिथे दाद मागायची त्यांनीच अटकेचे आदेश दिले तर नागरिकांनी न्याय कोठे मिळवायचा? सगळी न्यायव्यवस्था बेभान आणि बेफामपणे वागू लागली आहे. सरकारच्या कामात नाक खुपसणे आणि आपणच सरकार असल्याच्या तोऱ्यात सरकारची कामे उच्च आणि उच्चतम न्यायालये बिनदिक्कत करू लागली आहेत. सर्वसामान्य नागरिक सोडा; पण लेखक, पत्रकार आणि बुद्धिवंतदेखील या आधारावर न्यायालयांच्या बेताल वागण्याचे समर्थन करू लागले आहेत की, सरकार त्यांची कर्तव्ये पार पाडीत नसल्याने न्यायालयाला ती कामे पार पाडावी लागतात! ज्या राज्यघटनेच्या संरक्षणाची जबाबदारी वरच्या न्यायपालिकेवर आहे त्या घटनेत अशी कोठेही आणि कोणतीही तरतूद नाही की, सरकारने त्याचे काम केले नाही तर न्यायालयाने ती कामे पार पाडावीत. उद्या सरकारने असे म्हटले की न्यायालये त्यांची कर्तव्ये पार पाडीत नसल्याने लाखोंच्या संख्येने खटले तुंबले आहेत त्यामुळे ती खटले आम्ही चालवू तर हे मान्य होईल का? सर्वोच्च न्यायालयाने अगदी मामुली तांत्रिक कारणावरून एका कंपनीचे तब्बल ११००० कोटीचे कर दायीत्व लेखणीच्या एका फटकाऱ्याने कमी करून टाकले. सरकारने असा निर्णय घेतला असता तर केवढा गहजब झाला असता. याच न्यायालयाने सरकारवर कोरडे ओढण्यात धन्यता मानली असती. कोणाच्या ध्यानीमनी नसताना न्यायालय लाखो कोटींचा नद्याजोड

भारतात नुकतेच येऊन गेलेले जगप्रसिद्ध टाईम मासिकाचे संपादक झकेरिया यांनीही भारताच्या नेतृत्वाच्या उणीवेवर बोट ठेवले आहे. जगात जे काही सुरू आहे त्याबद्दल भारतीय नेतृत्व अनभिज्ञ असल्याचे फरीद झकेरिया यांनी म्हटले आहे. त्यामुळे जगातील उपलब्ध संधीचा भारताला लाभ घेता येत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. भारताचे नेतृत्व खुजे आणि थिटे असल्याचे शिक्कामोर्तबच त्यांनी केले आहे. केवळ देशांतर्गत घडी नीट बसविण्यासाठीच तरुण आणि खंबीर नेतृत्वाची आवश्यकता नाही तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील भारतीय कामगिरी प्रभावी करण्यासाठी नव्या राजकीय नेतृत्वाची देशाला गरज आहे; पण ज्यांनी देशाची सूत्रे आपल्या हाती घेतली पाहिजे असे तरुणच राजकीय अज्ञान आणि राजकीय अंधश्रद्धेचे बळी आहेत. अज्ञानातून भोळेभाबडे सामान्यजन जसे बाबा-महाराजांच्या नादी लागतात तसेच समाजासाठी काही करू इच्छिणारे तरुण अण्णा-बाबांच्या नादी लागून भरकटत आहेत. तरुणांचे हे भरकटणे थांबविता आले तर देशातील नेतृत्वाचे संकट दूर होण्यास वेळ लागणार नाही.



प्रकल्प तडीस नेण्याचा आदेश काय देते हे सगळेच देशाला अराजकाकडे नेणारे आहे. राजकीय नेतृत्व एवढे दुबळे आणि खुजे आहे की, ते न्यायालयांना आपल्या मर्यादेत राहण्याची समजदेखील देऊ शकत नाही.

या दुबळ्या राजकीय नेतृत्वामुळेच कॅगचे हिशेब तपासनीसदेखील सरकारने काय करायला पाहिजे याचा सल्ला नव्हे आदेश देऊ लागले आहे. कॅगचे काम हिशेब तपासून त्याचा अहवाल संसदेकडे सोपविणे एवढेच आहे. कॅगने काढलेले निष्कर्ष कधीच अंतिम नसतात. संसदीय समिती मान्य करील तेच अंतिम असते; पण समिती विचार करायच्या आधीच कॅगप्रमुख अहवाल फोडून मोकळे होतात आणि समितीवर दडपण आणण्यासाठी पत्रकार परिषदा घेऊन आपलेच कसे बरोबर आहे हे सांगत सुटतात. राजकीय नेतृत्व थिटे असले, की नको त्या लोकांचे महात्म्य कसे वाढते याचे एक उदाहरण कॅगप्रमुख विनोद राय आहेत आणि दुसरे उदाहरण म्हणजे भूषण पितापुत्र, केजरीवाल आणि किरण बेदी ही चौकडी आहे. या चौघांची आर्थिक लबाडी अनेक बाबतीत अनेकदा उघडकीस येऊनही ते भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे म्होरके बनून राजकीय नेतृत्वावर कुरघोडी करू लागले आहेत. एवढेच नाही तर लोकशाही व्यवस्थेतील सर्वोच्च संस्था असलेल्या संसदेला वाकुल्या दाखवून संसदेची खिल्ली उडविण्यापर्यंत या चौकडीची मजल गेली आहे. प्रसिद्धी देणारे कॅमेरे हीच या मंडळींची ताकद आणि तरीही राजकीय नेतृत्व यांच्या मर्कटलीला हतबल होऊन बघत बसण्यापलीकडे काही करू शकलेले नाही. संसदेत काही गुन्हेगार जाऊन बसलेत म्हणून संसदेचे अवमूल्यन झालेले नाही. गुन्हेगार तर अण्णा आंदोलनातही सामील होते. गावातील लोकांना दारू पिले म्हणून फटके मारणारे अण्णा रामलीला मैदानातील व्यासपीठावर दारूड्यांच्या भाषणाला टाळ्या पिटताना साऱ्या देशाने पाहिले आहे. रामलीला मैदानातील दारूड्यांच्या टोळक्यांनी आंदोलनाच्या बातम्या देणाऱ्या चॅनेलवाल्या बायांचे काय हाल केलेत हे त्यांना विचारले, की या गांधीवादी आंदोलनावर झगझगीत प्रकाश पडेल. तात्पर्य, गुन्हेगार सगळीकडे असतात तसे ते संसदेतही आहेत. अण्णांच्या आंदोलनात होते तसे न्यायधीशांच्या खुर्चीवर बसणारेही आहेत आणि लष्करप्रमुख म्हणून मिरविणारेही गुन्हेगारी कृत्य करतात; पण राजकीय नेतृत्वाला जनता रोज जो आरसा दाखविते त्यामुळे ते खजील झालेले असतात. एवढेच नाही तर स्वतः गुन्हा करणारे राजकीय नेतृत्वाला आरसा दाखविण्यात पुढे असतात. दुर्दैवाने देशात असे राजकीय नेतृत्वच नाही जे खजील न होता आरशात आपला चेहरा पाहू शकेल. देशापुढे ज्या अक्राळविक्राळ समस्या आहेत त्यावर तोडगा राजकीय नेतृत्वच काढू शकते; पण त्या उंचीच्या राजकीय नेतृत्वाचा अभाव हीच देशापुढची सर्वात मोठी समस्या बनली आहे. या समस्येने आता संकटाचे रूप धारण केले आहे. तरुणांच्या देशात जर्जर आणि म्हाताऱ्या नेतृत्वाला सोडचिठ्ठी देण्याची वेळ आली आहे कारण असे नेतृत्व अधिक काळ राहिले तर देशाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होईल. देशात टोळ्यांचे राज्य सुरू होईल. टोळी राज्याची झलक बंगालच्या ममता बॅनर्जीने आपल्या वर्तणुकीतून दाखवून दिली आहे. भारतात नुकतेच येऊन गेलेले जगप्रसिद्ध टाईम मासिकाचे संपादक झकेरिया यांनीही भारताच्या नेतृत्वाच्या उणीवेवर बोट ठेवले आहे. जगात जे काही सुरू आहे त्याबद्दल भारतीय नेतृत्व अनभिज्ञ असल्याचे फरीद झकेरिया यांनी म्हटले आहे. त्यामुळे जगातील उपलब्ध संधीचा भारताला लाभ घेता येत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. भारताचे नेतृत्व खुजे आणि थिटे असल्याचे शिक्कामोर्तबच त्यांनी केले आहे. केवळ देशांतर्गत घडी नीट बसविण्यासाठीच तरुण आणि खंबीर नेतृत्वाची आवश्यकता नाही तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील भारतीय कामगिरी प्रभावी करण्यासाठी नव्या राजकीय नेतृत्वाची देशाला गरज आहे; पण ज्यांनी देशाची सूत्रे आपल्या हाती घेतली पाहिजे असे तरुणच राजकीय अज्ञान आणि राजकीय अंधश्रद्धेचे बळी आहेत. अज्ञानातून भोळेभाबडे सामान्यजन जसे बाबा-महाराजांच्या नादी लागतात तसेच समाजासाठी काही करू इच्छिणारे तरुण अण्णा-बाबांच्या नादी लागून भरकटत आहेत. तरुणांचे हे भरकटणे थांबविता आले तर देशातील नेतृत्वाचे संकट दूर होण्यास वेळ लागणार नाही.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# वसंतदादा सांगली साखर कारखान्याच्या (संयुक्त) वार्षिक साधारण सभेवेळी शेतकरी संघटनेची समांतर सभा

**कोल्हापूर (शीतल राजोबा यांजकडून) :** सध्या आर्थिक संकटात असलेल्या आशिया खंडातील सर्वांत मोठ्या साखर कारखान्याची सन २००५-०६ ते २०१०-११ ची संयुक्त वार्षिक साधारण सभा कारखान्याच्या संस्कृती भवनात बुधवार दि. २८ मार्च रोजी आयोजित केली होती. महाराष्ट्राचे राजकारण करणाऱ्या या साखर कारखान्याची साधारण सभा गेली पाच वर्षे घेण्यात आली नव्हती. याचे कारण कारखानयची देणी वाढली असून आता ही कारखान्याची काही जागा विक्री करणे, सभासद भागाची किंमत पाच हजार वरून दहा हजार करणे, गेल्या पाच वर्षांचा वार्षिक अहवाल स्वीकारणे, नफा-तोटा पत्रकास व ताळेबंदास मंजुरी देणे बीओटी तत्त्वावर वीज निर्मिती प्रकल्प उभारणे तसेच इतरही विषयांवर सभा आयोजित केली होती.

शेतकरी संघटनेच्या संजय कोले, मधू हुक्के, रावसो दळवी, वसंत राजोबा, शिवाजी पाटील, शामगोंडा पाटील, जयपाल फराटे इत्यादी सभासदांनी अगोदरच कारखान्याकडे लेखी प्रश्न पाठवले होते. तरीही कारखान्याकडून उत्तर न मिळाल्याने संघटनेचे कार्यकर्ते सभासद सभेस बहुसंख्येने उपस्थित होते. पूर्वीपासून हा कारखाना वसंतदादा पाटील घराण्याच्या ताब्यात आहे. सध्या वसंतदादांचे नातू विशाल प्रकाश पाटील हे चेअरमन आहेत. गेल्या वर्षी कारखान्यांची निवडणूक बिनविरोध झाली. कारण सव्वीसपैकी गृहमंत्री आर. आर. पाटील गटाचे चार, आमदार संजय पाटील गट चार, पंतगराव कदम दोन, खासदार राजू शेट्टी दोन, रघुनाथदादा पाटील एक, मदन पाटील गटाचे चार असे व भाजपचे एक असे संचालक आहेत. त्यामुळे कारखान्यातील गैरकारभार विरोधात शेतकरी संघटनेने आवाज उठवला आहे. सभेवेळी संघटनेचे गुंडा माळी यांनी शेअर्स दरवाढीस कडाडून विरोध केला. त्यानंतर एक दोन सभासद बोलले व वसंतदादांपासून चालत आलेल्या परंपरेप्रमाणे पाळलेल्या पैलवानांनी काँग्रेसच्याच दुसऱ्या गटाच्या सभासदाला बेदम मारहाण करण्यास सुरुवात करून पूर्वीच ठरल्याप्रमाणे या गदारोळात चेअरमननी विषय वाचले. शंभर एक लोकांनी मंजूर मंजूरच्या घोषणा दिल्या व सर्वजण निघून गेले. यावेळी स्वाभीमानीच्या एका जिल्हाध्यक्षना व शिवसेनेच्या जिल्हाध्यक्षना पैलवानांचे तडाखे खावे लागले. यावेळी त्याच ठिकाणी शेतकरी संघटनेचे युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संजय कोले, माजी अध्यक्ष जयपाल फराटे, रावसाहेब दळवी, शिवाजी पाटील, सुहास गाडवे, गुंडा माळी, हणमंत कोळी, एकनाथ कापसे इत्यादींनी सभासदांची समांतर सभा घेऊन सभासदांना झालेल्या मारहाणीचा



निषेध केला व यावेळी बोलताना संघटनेचे नेते संजय कोले म्हणाले, 'ही सभा बेकायदेशीर आहे. सभासदांना वेळेवर अहवाल दिले नाहीत, युथ डेव्हलपमेंट सोसायटीतील ठेवींचे दहा कोटी रुपये कमी घेतले, खुल्या साखर विक्रीतील बासष्ट लाख रुपये येणे आहे. ऊस घालणाऱ्या शेतकऱ्यांना या कारखान्याने २०० ते ६०० रुपये कमी भाव दिला आहे. दोन कोटींहून जास्त रुपयांची मशिनरी गोडावूनला शिल्लक दाखवली आहे, अशा अनेक गंभीर बाबी आहेत. त्यामुळे कारखान्याने पोसलेले पैलवान सभासदांच्या अंगावर सोडण्याचा उद्योग केला आहे. हे खपवून घेणार नाही. येत्या चार दिवसांत पुन्हा सभा घ्यावी अन्यथा संघटनाच सभा बोलावेल.'


यावेळी जयपाल फराटे म्हणाले की, गेल्या ५० वर्षांत सभासदांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही. शेतकऱ्यांच्या ३५ कोटी रुपयांच्या परतीच्या ठेवी व त्यावरील व्याजासह सुमारे ८० कोटी रुपये अनामत खाती वर्ग केली आहेत. सभासद हे पैसे मागतील म्हणून त्या आधी सभा उधळून लावली आहे. आज मांडलेले ठराव व ही सभाच बेकायदेशीर असल्यानेच आम्ही शासनाकडे तक्रार करणार आहोत.

## मा. आ. वामनराव चटप यांना मातृशोक



**राजूरा :** शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते, स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी आमदार वामनराव चटप यांच्या मातोश्री भागिराथाबाई सदाशिवराव चटप यांचे वृद्धापकाळाने दि. ६ एप्रिल २०१२ रोजी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्षे होते. शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्ष परिवार वामनराव चटप व त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

## निळकंठ कोरांगे यांची जि.प. सभापतीपदी निवड



**राजूरा :** शेतकरी संघटनेचे श्री. निळकंठ कोरांगे यांची जिल्हा परिषद राजूराच्या समाज कल्याण सभापतीपदी निवड झालेली आहे. मा. आ. वामनराव चटप व स्थानिक कार्यकर्त्यांतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.